# हस्तकृती निर्देश- वीर

विश्वासाचे वीर घटक 2

# शमशोनाची गोष्ट

मुलं हया मजेदार पद्वतीने शमशोनाच्या जीवनाचे विविध भाग वापरून गोष्ट सांगणे पसंद करतील..




### साहित्य

- हस्तकृती नमूना
- रंग (रंग कांडया, पेन इ.)
- डिंक
- नळ्या प्लास्टिकचे
- ब्रॅड कागद चिकटविण्यासाठी
- कैची

### कृती

1. दिलेल्या रेषेवरून हस्तकृती नमूना कापा आणि चित्र रंगवा
2. दोनही कागदाच्या मध्ये कागद चिकटविण्यासाठी लहान छिद्र करा. खाली जाणारा गोल पूर्ण करा आणि एक बाजू नसलेला गोल वर जाईल जेणे करून खालचे चित्र दिसेल.
3. प्लास्टिक पुंगळीचे तीन तुकडे कापा. एक शमशोनाच्या डोळयावर आणि दोन वरच्या गोलावरील 'शमशोन' हया शब्दावर लावा.
4. अधिक डोळे आणि शमशोन हे नाव कापा आणि त्यांना  वर लावा म्हणजे त्याला 3 परिणामी दिसेल. आता तुम्ही शमशोनाची गोष्ट सांगू शकता.

# शाही मुगूट



### साहित्य

- प्रत्येक मुलासाठी मुगूटाचा नमूना
- 4 रंगीत कागदाचे मोठे हि-याचे आकार
- रंग रंगकांडया, पेन इ.
- डिंक
- रिबीन किंवा धागा
- मणी

### कृती



1. तुमच्या आवडत्या रंगाने मुगूट रंगवा

2. मुगूट नमुन्यानुसार कापा आणि दोन्ही कडेला धाग्यासाठी छिद्र करा.

3. मुगूटावर जिथे गोल आहेत तिथे मणी लावा.

4. दोन रेषांच्या मध्ये मोठे हिरे लावा. मोठयांच्यावर लहान हिरे लावा जेणे करून ते नगांसारखे दिसतील.

5. मुगूटाच्या कडांना रिबीन किंवा धागा बांधा आणि त्याचा वापर करून मुलांच्या डोक्याला मुगुट बांधा.

मुगूट घालण्यासाठी तयार आहे! तुम्ही शौल, दावीद किंवा शलमोन राजा हयांच्या कोणत्याही गोष्टीसाठी मुगूट वापरू शकता.

# येशू मार्ग आहे (दाराचे लटकन)

मुलं त्यांच्या घरातील दाराला किंवा घरातील इतर कोणत्याही भागाला सजविण्यात आनंद मानतील.

### साहित्य



- 1 लटकन नमूना
- पांढ-या कागदाचे किंवा जाड फोमचे 3 ढगं
- 2 कागदाचे किंवा फोमचे झाडाचे खोड
- 8 दगडं कागदी किंवा फोमचे
- रंग रंगकांडया, पेन इ.
- कैची
- डिंक

### कृती

1. दिलेल्या बाहेरील रेषेवरून लटकन नमूना कापा. वरील गोल कापायला विसरू नका.
2. तुमच्या आवडत्या रंगाने देखावा रंगवा.
3. येशूच्या चित्राजवळ आकाशात ढग चिटकवा.
4. रस्त्यावर दगडं चिटकवा.
5. शेवटी झाडाचे खोड चिटकवा आणि झाडाचा वरचा भाग.
   घरी नेण्यासाठी हस्तकला तयार आहे, दाराच्या कडीला किंवा घरात कुठेही ते लटकवा.